महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११ ००४. 4846

!!प्रकटन!!

विषय :- फेब्रुवारी–मार्च २०२६ च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षा व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या खेळाडू विद्यार्थ्यांचे क्रीडा सवलतीचे प्रस्ताव ऑनलाईन सादर करणेबाबत

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांचेशी संलग्न असलेल्या सर्व माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांचे मुख्याध्यापक/प्राचार्य, शिक्षक, विद्यार्थी व पालक यांना सूचित करण्यात येते की, शासन निर्णय क्रमांक – उमाशि–२०१५/प्र.क्र.२६२/एस.डी.२ , दिनांक २० डिसेंबर २०१८ नुसार माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षा व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या खेळाडू विद्यार्थ्यांना व एन.सी.सी., स्काऊट गाईड मधील विद्यार्थ्यांना क्रीडा सवलतीचे गुण देण्यात येतात.

सदर शासन निर्णयानुसार जिल्हा क्रीडा अधिकारी यांचेकडून क्रीडा प्रस्ताव तसेच एन.सी.सी. स्काऊट गाईड इत्यादी प्रस्ताव शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचेकडून दरवर्षी विभागीय मंडळाकडे सादर केले जातात.

त्याअनुषंगाने फेब्रुवारी – मार्च २०२६ च्या इ.१० वी व इ.१२ परीक्षेस प्रविष्ट खेळाडू विद्यार्थ्यांचे प्रस्ताव जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी दि. १५/०४/२०२६ पर्यंत संबंधित विभागीय मंडळाकडे आपले सरकार पोर्टलव्दारे ऑनलाईन पध्दतीने पाठवावयाचे आहेत.

तसेच एन.सी.सी., स्काऊट गाईड चे प्रस्ताव शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी विभागीय मंडळांकडे प्रचलित पध्दतीने दि. १५/०४/२०२६ पर्यंत पाठवावयाचे आहेत.

याबाबत सर्व जिल्हा क्रीडा अधिकारी, सर्व शिक्षणाधिकारी (माध्यमिक) तसेच माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालये मुख्याध्यापक/प्राचार्य, शिक्षक, विद्यार्थी, पालक, व सर्व संबंधित घटकांनी उपरोक्त बाबींची नोंद घेऊन त्याप्रमाणे उचित कार्यवाही करावी.

दिनांक २६/०२/२०२६

(डॉ.दिपक माळी)
सचिव
राज्यमंडळ, पुणे-४

जा.क्र.छ.संविमं/उमाक/१४०३/4846 दि. 2/03/2026

प्रती,
मुख्याध्यापक/प्राचार्य,
सर्व मान्यता प्राप्त माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालये,
छत्रपती संभाजीनगर/बीड/जालना/परभणी/हिंगोली

विषय:- फेब्रुवारी-मार्च २०२६ च्या माध्यमिक शालांन्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षा व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षेस प्रविष्ट होणा-या खेळाडु विद्यार्थ्यांचे क्रीडा सवलतीचे प्रस्ताव ऑनलाईन सादर करणेबाबत

संदर्भ:- राज्य मंडळ, पुणे यांचे पत्र क्र.रा.मं./परीक्षा-७/९०८ दि.२६.०२.२०२६ अन्वये.

उपरोक्त राज्य मंडळ, पुणे यांचे प्रकटनानुसार मुख्याध्यापक/प्राचार्य, यांनी आपल्या शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाच्या स्तरावर नोंद घेवुन उचित कार्यवाही करावी.

प्र.विभागीय सचिव,
विभागीय मंडळ, छत्रपती संभाजीनगर

प्रत माहितीस्तव सादर.
१.मा.सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे-०४
२.शिक्षण उपसंचालक, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर

प्रत आवश्यक त्या कार्यावाहीस्तव सादर.
१. शिक्षणधिकारी (माध्य), जि.प. छत्रपती संभाजीनगर/बीड/जालना/परभणी व हिंगोली
२. जिल्हा क्रिडा अधिकारी, छत्रपती संभाजीनगर/बीड/जालना/परभणी व हिंगोली

Scanned with OKEN Scanner